ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ ' श्रेणी)

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक -४२२ २२२

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

वसतिगृह व्यवस्थापन पदविका (D181) शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

Diploma In Hostel Management (DHM)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७

जून-२०२६ तुकडी

विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ॥ 1 ॥

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ 2 ॥

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥ 3 ॥

- कुसुमाग्रज

निर्मिती
श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222

© २०२६, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
प्रथम प्रकाशन : जून, २०२६
प्रकाशक : डॉ. गोविंद कतलाकुटे, कुलसचिव , यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222

वसतिगृह व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (D181) : माहितीपुस्तिका

अनुक्रमणिका

१. विद्याशाखेचा परिचय ----------४
२. वसतिगृह व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाविषयी ----------४
   २.१ शिक्षणक्रमाची संरचना
   २.२ प्रवेश पात्रता
   २.३ कालावधी
   २.४ माध्यम
   २.५ शिक्षणक्रम शुल्क
   २.६ मूल्यमापन प्रक्रिया
   २.७ पुर्नपरीक्षार्थी साठी सूचना
३. Academic Bank of Credit ID तयार करण्याबाबतची सूचना ----------१३
४. एकाच वेळी दोन शिक्षणक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना १३
५. विभागीय केंद्रे----------१४
६. अभ्यासकेंद्रे----------१५
७. विशेष सूचना/संपर्कासाठी----------१६
८. परिशिष्टे ----------१८
   परिशिष्ट २ : उमेदवार/अध्ययनार्थी करारनामा
   Candidate/Student Agreement at the time of Admission
   परिशिष्ट ३ : गरीब अध्ययनार्थी सहाय्य योजना नियमावली
   परिशिष्ट ४ : University Grant Commission Resolution (2004)
   परिशिष्ट ५ : G.R. of Equivalency for 10th and 12th
   परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश
   परिशिष्ट ७ : G.R. of Equivalency
   परिशिष्ट ८ : Letter of Recognition from UGC
   परिशिष्ट 9 : अध्ययनार्थी सहायता आणि अध्ययनार्थी कल्याण योजना
   परिशिष्ट १० : Student Corner

१. विद्याशाखेचा परिचय

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा ही मुक्त विद्यापीठाची एक महत्त्वाची विद्याशाखा आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ही विद्याशाखा कार्यरत आहे. सन १९९१ पासून भारताने मुक्त धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशात तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रचंड घडामोडी झाल्या. माहिती, तंत्रज्ञान आणि संगणक युगात पारंपरिक व्यापार पद्धतीला फाटा देऊन इंटरनेट, ई-कॉमर्स अशा संज्ञा रूढ झाल्या. त्यानुसार शिक्षणपद्धतीच्या तंत्रज्ञानातही बदल करावा लागला. आभासी शिक्षणपद्धती, सीडीच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती करून देणे, इंटरनेटवरून आवश्यक ते संदर्भ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, उपग्रहाद्वारे शिक्षण तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अशा माहितीचे स्रोत विद्यार्थ्यांना प्राप्त करून देणे, यासारख्या सोई विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या क्षमतेत निश्चितच वाढ झाल्याचे दिसून येते आणि हे कार्य वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने यशस्वीपणे पार पाडले आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत दोन पदव्युत्तर शिक्षणक्रम, तीन पदवी शिक्षणक्रम आणि सहा पदविका शिक्षणक्रम चालविले जातात. या शिक्षणक्रमात एम. बी. ए., एम.कॉम (NEP2020), बी. कॉम., BBA-AFM, BBA-Event Management, BA-FSM, सहकार व्यवस्थापन पदविका, सहकार व्यवस्थापन पदविका बँकिंग, डीप्लोमा AHTTM, वाहतूक व्यवस्थापन पदविका, इत्यादी शिक्षणक्रमांचा समावेश आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेची उद्दिष्टे

१. वसतिगृह व्यवस्थापनासाठी आवश्यक कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सामाजिक जबाबदारी, मानवी मूल्ये आणि सांस्कृतिक जाणीव विकसित करणे.

२. वसतिगृह प्रशासन, कार्यालयीन कामकाज, आर्थिक नियोजन, व्यवस्थापन कौशल्ये आणि व्यवहारज्ञान यांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांना विविध संस्था व वसतिगृह व्यवस्थापन क्षेत्रासाठी सक्षम बनविणे.

३. बदलत्या शैक्षणिक व सामाजिक गरजांनुसार विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवस्थापन तंत्रज्ञान, नेतृत्वगुण आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करणे.

४. संशोधन, प्रशिक्षण व विविध उपक्रमांच्या माध्यमातून वसतिगृह व्यवस्थापन अधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण बनविणे तसेच संबंधित शिक्षणक्रमांचा प्रसार करणे.

५. वसतिगृह व्यवस्थापक, अधीक्षक व प्रशासकीय पदांसाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून विद्यार्थ्यांना समृद्ध व जबाबदार जीवनासाठी तयार करणे.

२. वसतिगृह व्यवस्थापन पदविका (D181) शिक्षणक्रमाविषयी

प्रास्ताविक-

"विद्यार्थ्यांचे सुरक्षित, शिस्तबद्ध व सर्वांगीण विकासाला पोषक असे वातावरण निर्माण करणे हीच खरी शिक्षणसेवा आहे."

आजच्या आधुनिक शिक्षणव्यवस्थेमध्ये वसतिगृहांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण तसेच दुर्गम भागातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ, शिस्तबद्ध व अभ्यासपूरक निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात वसतिगृहांची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

वाढती शैक्षणिक केंद्रे, निवासी शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था, कामगार वसाहती, महिला व मुलींची वसतिगृहे तसेच खासगी निवासी प्रकल्प यांच्या वाढत्या संख्येमुळे प्रशिक्षित व कुशल वसतिगृह व्यवस्थापकांची गरज निर्माण झाली आहे.

वसतिगृह व्यवस्थापन हे केवळ निवास व्यवस्था सांभाळण्यापुरते मर्यादित नसून त्यामध्ये प्रशासन, शिस्त, सुरक्षा, आर्थिक नियोजन, विद्यार्थ्यांचे आरोग्य, भोजन व्यवस्था, संवादकौशल्य, आपत्कालीन परिस्थिती हाताळणी आणि मानव संसाधन व्यवस्थापन अशा अनेक घटकांचा समावेश होतो.

आज अनेक संस्था प्रशिक्षित वसतिगृह अधीक्षक, वार्डन, प्रशासकीय अधिकारी व व्यवस्थापकांना प्राधान्य देतात. मात्र पारंपरिक शिक्षणात या प्रकारचे व्यवहारज्ञान व कौशल्याधारित प्रशिक्षण कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे अनेक युवक रोजगाराच्या संधींपासून वंचित राहतात.

या पार्श्वभूमीवर "वसतिगृह व्यवस्थापन पदविका (D181)" हा शिक्षणक्रम विद्यार्थ्यांना व्यावसायिक, व्यवहारिक आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना वसतिगृह व्यवस्थापनाशी संबंधित सर्व आवश्यक ज्ञान, तांत्रिक कौशल्ये व प्रशासनिक क्षमता प्रदान करतो.

या शिक्षणक्रमामध्ये वसतिगृह प्रशासन, कार्यालयीन व्यवस्थापन, नोंदवही लेखन, विद्यार्थी समुपदेशन, सुरक्षा नियम, स्वच्छता व्यवस्थापन, भोजन व्यवस्था, आर्थिक व्यवस्थापन, संगणकीय नोंदी, संवादकौशल्य आणि नेतृत्व विकास यांचा सखोल अभ्यास समाविष्ट आहे.

या अभ्यासक्रमामुळे युवकांना शैक्षणिक संस्था, निवासी शाळा, महाविद्यालयीन वसतिगृहे, सामाजिक संस्था, महिला व बालकल्याण केंद्रे, कामगार वसाहती तसेच खासगी निवासी प्रकल्पांमध्ये रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

वसतिगृह व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाची उद्दिष्टे (Program Outcomes)

१. विद्यार्थ्यांना वसतिगृह व्यवस्थापन क्षेत्रासाठी रोजगाराभिमुख, कौशल्याधारित व व्यवहारिक प्रशिक्षण प्रदान करून प्रशिक्षित व जबाबदार मनुष्यबळ तयार करणे.

२. विद्यार्थी वसतिगृह अधीक्षक, वार्डन, निवासी व्यवस्थापक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी समन्वयक इत्यादी पदांवर कार्य करण्यास सक्षम बनविणे.

३. वसतिगृहाच्या दैनंदिन कामकाज, प्रशासन, कार्यालयीन व्यवस्थापन, पत्रव्यवहार व नोंदवही लेखन यांचे सखोल ज्ञान विकसित करणे.

४. विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता, शिस्त, आरोग्य व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळणी, सुरक्षा नियम व आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे.

५. भोजन, स्वच्छता, निवास व्यवस्था, आर्थिक व्यवहार, लेखा व्यवस्थापन व आर्थिक नियोजन यांचे व्यवहारिक ज्ञान प्रदान करणे.

६. विद्यार्थी समुपदेशन, मानव संसाधन व्यवस्थापन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण व सामाजिक समन्वय कौशल्यांचा विकास करणे.

७. संगणकीय प्रणाली, डिजिटल नोंदी, आधुनिक तंत्रज्ञान तसेच वसतिगृह व्यवस्थापनाशी संबंधित कायदे, नियम व शासकीय मार्गदर्शक सूचनांची ओळख करून देणे.

८. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये, सेवाभाव, व्यक्तिमत्त्व विकास, जबाबदारीची भावना तसेच स्वयंरोजगार व उद्योजकतेचा दृष्टीकोन विकसित करणे.

२.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) वसतिगृह व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम संकेतांक

'वसतिगृह व्यवस्थापन पदविका'हा शिक्षणक्रम एकूण ४२ श्रेयांकांचा आहे. यात पुढील अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

वर्ष / सत्र	विषयाचे नाव	विषयाचे संकेतांक	श्रेयांक	गुण
I	१. वसतिगृह व्यवस्थापन	DHM 101	४	१००
	२. वसतिगृह व्यवस्थापन कौशल्ये भाग – १	DHM 102	४	१००
	३. युवक व युवतींचे मानसशास्त्र	DHM 103	४	१००
	४. कर्मचाऱ्यांसाठी सेवा नियम व कायदे	DHM 104	४	१००
	५.वसतिगृह हिशेब लेखन भाग – १	DHM 105	४	१००
	Semester-I एकूण गुण		**२०**	**५००**
II	१. संगणकाचे मुलभूत ज्ञान व उपयोजीयता	DHM 106	४	१००
	२. वसतिगृह व्यवस्थापन कौशल्ये भाग - २	DHM 107	४	१००
	३. मानवी संसाधन आणि कर्मचारी विकास	DHM 108	४	१००
	४. आपत्ती व्यवस्थापन	DHM 109	४	१००
	५. वसतिगृह हिशोब लेखन भाग - २	DHM 110	४	१००
	६. प्रकल्प अहवाल (Project Work)	DHM 111	४	१००
	Semester-II एकूण गुण		**२४**	**६००**
	एकूण गुण (SemesterI + semester II)		**४४**	**११००**

प्रकल्प अहवाल (Project Report) (अनिवार्य)

विद्यार्थ्यांनी दुसऱ्या सत्रामध्ये प्रकल्प अहवाल पूर्ण करणे अनिवार्य आहे.

(प्रकल्प अहवालाचे अंतिम मूल्यमापन विद्यापीठस्तरावर केले जाईल. प्रकल्प अहवालाचे मार्गदर्शक सूचना वेळोवेळी दिले जातील.)

श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)

सामान्यत: एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययन तासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययन तासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या

अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे. वसतिगृह व्यवस्थापन पदविकासाठी पात्र ठरण्यासाठी विद्यार्थ्याने एकूण ४४ क्रेडिट पॉइंट्स मिळवणे आवश्यक आहे.

अभ्यास पद्धती

मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाण्याची आवश्यकता नसते आणि त्यांच्या अभ्यासासाठी निश्चित वेळापत्रकही नसते. अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने स्वतंत्र अभ्यास पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीमध्ये खालील घटकांचा समावेश आहे:

- स्वयं-अध्ययन साहित्य
- अध्ययन साहित्याची सॉफ्ट कॉपी (PDF स्वरूपात) अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे
- अभ्यास केंद्रावर विषय तज्ज्ञांद्वारे संपर्क सत्रांमध्ये समुपदेशन केले जाते

अभ्यास साहित्याची वैशिष्ट्ये

विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाचे अभ्यासक्रम (syllabus) आणि अभ्यास साहित्य (PDF स्वरूपात) फक्त ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिले जाते. स्वयं-अध्ययन साहित्य (SIM – Self Instructional Material) चे इलेक्ट्रॉनिक स्वरूप विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://ycmou.digitaluniversity.ac) उपलब्ध आहे.

हे अभ्यास साहित्य लहान-लहान युनिट्समध्ये विभागलेले असल्यामुळे एका वाचनातून ते समजून घेता येते. प्रत्येक युनिटच्या शेवटी प्रश्न दिलेले असतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वाचलेल्या विषयाचा आढावा घेता येतो. यामुळे विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयाचा सखोल अभ्यास करण्यास मदत होते.

जर विद्यार्थ्याला कोणतीही अडचण आली, तर तो/ती त्या अडचणींची नोंद करू शकतो/शकते. या नोंदी केलेल्या अडचणी संपर्क सत्रांदरम्यान अभ्यास केंद्रावर समुपदेशकांसोबत चर्चेसाठी मांडता येतात.

संपर्क सत्रांचे स्वरूप (Nature of Contact Sessions)

संपर्क सत्रांदरम्यान समुपदेशक विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्याच्या आधारे मार्गदर्शन व चर्चा करतात. या सत्रांमध्ये विद्यार्थी आपले सहाध्यायी तसेच समुपदेशकांसोबत चर्चा करून आपल्या शंका व अडचणी दूर करू शकतात.

या संपर्क सत्रांव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यास केंद्राद्वारे आयोजित केले जाणारे प्रात्यक्षिक (practical) तसेच विविध प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२.२ प्रवेश पात्रता

या शिक्षणक्रमासाठी प्रवेश खालीलपैकी कोणतीही एक अट पूर्ण केल्यास दिला जाईल —

१. महाराष्ट्र राज्य किंवा इतर कोणत्याही राज्याच्या उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे. **किंवा**

२. AIU कडून वेळोवेळी मान्यताप्राप्त विविध मंडळांमधून १२ वी किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेला विद्यार्थी.

Eligibility Criteria

The admission to this programme is based on fulfilling any one of the following criteria –

1. H.S.C. or equivalent examination of Maharashtra or other state HSC Board.

   OR

2. Learner who has passed HSC OR equivalent examination from various board as approved by AIU from time to time.

विशेष सूचना

प्रवेश-अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

१. शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत (Attested Photocopy)
2. शैक्षणिक पात्रतेबाबतच्या गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रत
३. विद्यार्थ्यांनी प्रवेश-अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये. जोडल्यास विद्यापीठ सदर प्रत / प्रती परत पाठविणार नाही व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४. नावामध्ये बदल करावयाचा असल्यास तो फक्त प्रथम वर्षाच्या सुरुवातीसच मान्य राहील. नाव बदलासाठी विद्यार्थ्यांनी शासन राजपत्रातील (Government Gazette) अधिसूचना विद्यापीठास सादर करणे आवश्यक राहील.

२.३ कालावधी

अ. किमान कालावधी : १ वर्ष
ब. कमाल कालावधी : २ वर्षे

२.४ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. या अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, श्रवणफिती, चित्रफिती, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन,गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतून राहतील.

२.५ शिक्षणक्रम शुल्क

या शिक्षणक्रमाचे एकूण शिक्षणक्रम शुल्क रु.११२६६/- (अकरा हजार दोनशे सहासष्ट रुपये मात्र) आहे. त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे –

विद्यापीठ शुल्क अभ्यासकेंद्र शुल्क	रु. ३२००=०० रु. ४८००=००
एकूण शिक्षणक्रम शुल्क	रु. ८०००=००

अ) संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क(रु.)
अ	**शुल्काचे स्वरूप**	
१	नोंदणी शुल्क	२००
२	पात्रता शुल्क	१००
३	ओळखपत्र शुल्क	१०
४	माहितीपुस्तिका शुल्क	५०
५	ई-सुविधा / ई -सर्विसेस शुल्क	११८
६	ग्रंथालय शुल्क	१०
७	कुलपती ऑफीस इव्हेण्ट शुल्क	३८
८	क्रीडा शुल्क	५०
९	विद्यार्थी कल्याण निधी	५०
१०	आपत्ती व्यवस्थापन	१०
११	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क (NSS)	१०
१२	माजी विद्यार्थी शुल्क	१०
१३	संवाद शुल्क	१०
१४	विद्यार्थी विमा योजना शुल्क	२०
१५	पदविका समारंभ शुल्क	४५०
	एकुण अ	**११३६**
ब	**शिक्षण शुल्क**	
	विद्यापीठ शुल्क	३२००
	अभ्यासकेंद्र शुल्क	४८००
	एकुण ब	**८०००**
क	**परीक्षा फी (थेअरी)**	
	प्रथम सत्र (Semester – I)	९००
	द्वितीय सत्र (Semester – II)	१२३०
	एकुण क	**२१३०**
ड	**एकूण फी (अ+ब+क)**	**११२६६**

(ब) शिक्षण व परीक्षा शुल्क

शिक्षण शुल्क (Tuition Fees)	८०००
परीक्षा शुल्क	२१३०
संवैधानिक शुल्क	११३६
एकूण शिक्षणक्रम शुल्क रुपये	११२६६

शुल्क भरण्यासंबंधी सूचना :

विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. ११२६६/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धती-शिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

महत्त्वाची सूचना:

एकूण शुल्क रु. ११२६६/- विद्यापीठाने निर्धारित केलेल्या प्रक्रियेनुसार ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठाच्या खात्यात जमा करावे.

शिक्षणक्रम शुल्क: (Programme Fee)

शिक्षणक्रमाचे शुल्क एक-रकमी भरावे लागेल. शुल्क हप्त्यांमध्ये किंवा भागांमध्ये भरण्यास परवानगी नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम (UGC च्या) मार्गदर्शक सूचनेनुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर कोणतेही प्रवेश केले जाणार नाहीत याची विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.

महत्त्वाची सूचना : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या (YCMOU) धोरणात्मक निर्णयानुसार अंध विद्यार्थी, कारागृहातील कैदी, तृतीयपंथी व्यक्ती, अनाथ विद्यार्थी, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुले तसेच एचआयव्ही बाधित विद्यार्थी यांना केवळ रु. १०/- (रुपये दहा फक्त) इतके नाममात्र शुल्क भरून प्रवेश घेता येईल.

प्रवेश रद्द करणे व शुल्क परतावा धोरण: (Admission Cancellation and Fee Refund Policy)

ज्या विद्यार्थ्यांना आपला प्रवेश रद्द करून शुल्क परतावा घ्यायचा आहे, त्यांनी विद्यापीठाने जाहीर केलेल्या प्रवेशाच्या अंतिम तारखेपूर्वी किंवा त्या दिवशी प्रवेश रद्द करणे आवश्यक आहे. शुल्क परताव्यासाठी विद्यार्थ्यांनी बँक पासबुकची प्रत, मूळ शुल्क पावती आणि प्रवेश अर्जाची प्रत यांसह लेखी अर्ज सादर करावा.

प्रवेश रद्द करणे व शुल्क परतावा यासाठीचा अर्ज प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सादर केल्यास, शुल्क परतावा हा विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) यांनी वेळोवेळी सुधारित केलेल्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसारच केला जाईल.

अभ्यास केंद्र बदलण्यास मनाई: (No change of Study Centre)

प्रवेश निश्चित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अभ्यास केंद्र बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.

टीप: (Note)

1. वरील नमूद केलेल्या प्रति सत्र अभ्यास केंद्र शुल्कामध्ये अभ्यास केंद्राकडून प्रदान करण्यात येणाऱ्या पुढील सुविधांचे शुल्क समाविष्ट नाही: गणवेश, ग्रूमिंग किट, बॅग, बॅचेस व एपॉलेट्स, फर्स्ट एड बॉक्स, पासपोर्ट इत्यादी.
2. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द झाल्यास, शिक्षणक्रम प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही.
3. अंतिम परीक्षा व गुणपत्रिका शुल्क प्रवेश अर्जासोबतच घेतले जाते. त्यामुळे नियमित विद्यार्थ्यांनी अंतिम परीक्षेसाठी स्वतंत्र परीक्षा अर्ज भरायची आवश्यकता नाही.
4. विद्यार्थ्यांनी प्रथम सत्राच्या प्रवेशावेळी शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

२.६ मूल्यमापन प्रक्रिया

या शिक्षणक्रमाची मूल्यमापन पद्धती पुढील घटकांवर आधारित असेल. प्रत्येक १०० गुणांच्या अभ्यासक्रमासाठी ७० गुण विद्यापीठ मूल्यमापन (अंतिम परीक्षा [EE]) आणि 30 गुण सतत मूल्यमापन (गृहपाठ [CA]) यासाठी असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात विद्यापीठ मूल्यमापन आणि गृहपाठ मूल्यमापन या दोन्हीमध्ये स्वतंत्रपणे किमान 40% गुण मिळवणे आवश्यक आहे. गृहपाठ मूल्यमापनातील गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दर्शविले जातील.
या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तीन पद्धतींनी करण्यात येईल.

(१) अंतर्गत मूल्यमापन,
(२) प्रकल्प अहवाल (Project Report) आणि
(३) अंतिम परीक्षा.

अंतर्गत मूल्यमापन (Continuous Assessment / Home Assignment)

(अ) गृहपाठ

गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येतील. http://ycmou.digitaluniversity.ac

विद्यार्थ्यांनी गृहपाठाचे प्रश्न संकेतस्थळावरून डाउनलोड करावेत. गृहपाठ स्वच्छ हस्ताक्षरात लिहून त्याची सॉफ्ट कॉपी विद्यापीठाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार Home Assignment Submission Portal द्वारे सादर करावी. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचना नियमितपणे पाळाव्यात आणि गृहपाठ वेळेत सादर करण्यासाठी संबंधित अध्ययन केंद्राशी संपर्क ठेवावा. प्रत्येक अभ्यासक्रमाचा गृहपाठ त्याच शैक्षणिक वर्षातील संबंधित सत्रामध्ये निश्चित तारखेत पूर्ण करणे आवश्यक आहे. ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला असेल त्याच वर्षात गृहपाठ पूर्ण करणे अपेक्षित असून त्यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही.
वसतिगृह व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ३० गुणांचे गृहपाठ विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

(आ) प्रकल्प अहवाल (DHM 111)

उपर्युक्त शिक्षणक्रमांसाठी ठरवून दिलेल्या किंवा विद्यार्थ्यांनी निवडलेल्या एखाद्या वसतिगृहाचा प्रकल्प अहवाल (Project Report) विद्यार्थ्यांना करावा लागेल. त्यासाठी संबंधित संस्थेला प्रत्यक्ष भेट देणे, त्यांच्याकडून माहिती मिळवून संस्थेच्या वार्षिक अहवालाचे मूल्यमापन करणे, इत्यादी बाबतीत अभ्यास करून तो केंद्र-संयोजकाकडे विहित मुदतीत सादर करावा लागेल.

ज्या संस्थेचा प्रकल्प अहवाल केला असेल त्या संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्याकडून उपस्थितीबाबतचा दाखला प्रकल्प अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केंद्रसंयोजकाकडे प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर केंद्रसंयोजक सर्व प्रकल्प अहवाल विद्यापीठाकडे ठरवून दिलेल्या मुदतीत सादर करतील. प्रकल्प अहवालाचे मूल्यमापन विद्यापीठस्तरावर करण्यात येईल.

अंतिम मूल्यमापन

प्रत्येक अभ्यासक्रमाची १०० गुणांची अंतिम परीक्षा घेण्यात येईल. अंतिम परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

(१) प्रश्नपत्रिका ही एकूण ७० गुणांची असून त्यामध्ये मुख्य १० मार्काचे ३ प्रश्न असतील (प्रश्न क्र.१, २, & ३). चौथ्या प्रश्नामध्ये ५ मार्काचे ६ उपप्रश्न दिले जातील, त्यापैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवावयाचे आहेत. याप्रमाणेच पाचव्या प्रश्नामध्ये ३ मार्काचे ६ उपप्रश्न दिले जातील, त्यापैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवावयाचे आहेत. (३०+२५+१५=७०)

सूचना

(१) प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे **उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

(२) प्रकल्प अहवालात ७० पैकी व ३० पैकी मिळालेल्या गुणांची बेरीज करण्यात येईल. प्रकल्प अहवाल व तोंडी परीक्षा ह्या मूल्यमापनाच्या घटकात एकत्रितपणे उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.

(३) सर्व अभ्यासक्रमात मिळालेल्या गुणांची बेरीज करून विद्यार्थ्यांस प्रतिशत गुण दर्शविण्यात येतील.

२.७ पुर्नपरीक्षार्थी साठी सूचना

जे विद्यार्थी एका किंवा अनेक विषयात अनुउत्तीर्ण / अनुपस्थित राहिल्यास त्यांना पुढील परीक्षा सत्रात पुनँपरीक्षार्थी फॉर्म व शुल्क भरून विषय उतीर्ण करता येईल. सदर शुल्क खालीलप्रमाणे –

अ.क्र.	तपशील	BA/ B.Com इतर शिक्षणक्रम
१	प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून)	रु. १८० प्रती पेपर
२	पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा	रु. २०० प्रती पेपर
३	प्रात्यक्षिक/ मौखिक परीक्षा (विं-वोचे) **प्रात्यक्षिक/स्टुडीओ वर्क /टर्म वर्क-** **प्रकल्प / मौखिक -**	रु. २२० रु. ३३०
४	मार्कशीट शुल्क	रु. १००
५	विलंब शुल्क	रु. १००
६	अतिविलंब शुल्क	रु. ५००

सूचना: सदर परीक्षा शुल्कात विद्यापीठ निर्णयानुसार बदल होऊ शकतो.

३. Academic Bank of Credit ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार Academic Bank of Credit ID आपणास तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती **Digi Locker(ABC-NAD)** वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास **Academic Bank of Credit ID** नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाइटला भेट द्या. या वेबसाइटवरील student zone या बटनला क्लिक करा. यातील **Academic Bank of Credit ID** वर क्लिक केल्यानंतर **Academic Bank of Credit ID** तयार करण्यासंबंधित माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाइटवर उपलब्ध केलेले आहे.

४. एकाच वेळी दोन शिक्षणक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना:

विद्यार्थ्याने एकाच वेळी एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेतल्यामुळे दोन विविध शिक्षणक्रमांच्या विषयांच्या परीक्षा एकाच दिवशी (overlap) आल्याने विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित राहिल्यास, अशा विद्यार्थ्यांना संबंधित विषयाच्या पुढील परीक्षेस विनाशुल्क बसण्याची परवानगी देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांनी लेखी अर्ज आपल्या अभ्यासकेंद्रामार्फत संबंधित विभागीय केंद्राकडे सादर करणे आवश्यक राहील.

एकाच वेळी एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी, दोन्ही शिक्षणक्रमांच्या परीक्षा, समंत्रण व इतर शैक्षणिक बाबींचे वेळापत्रक एकमेकांशी overlap होणार नाही याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी. जर विद्यार्थी दोन शिक्षणक्रमांसाठी प्रवेश घेण्याचा विचार करत असेल, तर त्याने/तिने अभ्यासक्रमांची निवड काळजीपूर्वक करावी, जेणेकरून परीक्षांचे वेळापत्रक overlap होणार नाही. जर परीक्षा वेळापत्रक overlap झाले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील.

५. विभागीय केंद्रे

(१) **अमरावती** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही., अमरावती - 444 604
✆ : (0721) 2531444 फॅक्स : 2531445

(२) **छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद)** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र सर्व्हे नं. 41, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस नंदनवन कॉलनी, छावणी औरंगाबाद - 431 002
✆: (022) 2371077/2371066 फॅक्स : (022) 2371088

(३) **मुंबई** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र द्वारा:जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक ग्रँट रोड (प.) मुंबई - 400 007
✆:(022)23874186/23874177 फॅक्स : (022) 23813256

(४) **नागपूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी., लक्ष्मी-नारायण बंगला विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस रविनगर चौक, नागपूर - 440 001
Phone: (0712) 2553724/ 25 फॅक्स : 2553725

(५) **नाशिक** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगर-पालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला नवीन पंडित कॉलनी, नाशिक -422 002
✆: (0253) 2317063 फॅक्स : 2576756

(६) **पुणे** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह,महापालिका शाळा क्र.5 (मुलांची), 654, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग पुणे -411 030
✆: (020) 24457914 फॅक्स : 24491107

(७) **कोल्हापूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र शिवाजी विद्यापीठ परिसरपोस्ट ऑफीसजवळ विद्यानगर, कोल्हापूर - 416 004
✆: (0231) 2607022
फॅक्स : 2607023

(८) **नांदेड** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत नांदेड - 421 606
✆: (02462) 229940 / 283038 फॅक्स : 22995

६. अभ्यासकेंद्र

अ.क्र.	अभ्यासकेंद्र सांकेतांक	अभ्यासकेंद्र	पत्ता	दूरध्वनी
१.	६२५५३	ॐ ग्रामन्ये इन्सिटयूट फॉर एज्युकेशन एक्सलन्स	रितिका कॉम्पेलेक्स नऱ्हे रोड, धायरी फाटा, पुणे-४११०४१	०२०-२४३९३९११ भ्रमणध्वनी - ९०११८६३९९९

७. विशेष सूचना / संपर्कासाठी

(अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

२. मुदतीत प्रवेश घेणाऱ्या अध्ययन साहित्य अभ्यासकेंद्रावर मिळेल.

३. विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, फी भरल्याच्या पावत्या, बँकेतील चलन, इत्यादी कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN: Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना झठछ लिहिणे आवश्यक आहे. झठछ अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

४. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्रा-व्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा 'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.

५. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

६. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणेच वर्गचाचणी आणि अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

७. विद्यापीठाकडून गृहपाठ अभ्यासकेंद्रामार्फत दिले जातील. ते केवळ अभ्यासाच्या सरावासाठी आहेत. त्यांची उत्तरे लिहून पाहा. काही अडचणी असल्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक अध्यापकां-कडून मार्गदर्शन घ्यावे.

८. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

(आ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222. दूरध्वनी क्र. (0253) 2231714, 2231715, 2230227.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी 9.30 व सायंकाळी 5.00 वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत -

- सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45
  (दुपारी 1.30 ते 2 सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

❖ **विशेष अडचणींबाबत संपर्क**

1. **माहितीपुस्तिका, अभ्यासकेंद्र अडचणी :**

शिक्षणक्रम संयोजक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
दूरध्वनी : (0253) 2231477
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

2. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :**

संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
दूरध्वनी - (0253) 2231477

3. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :**

उपकुलसचिव, नोंदणी कक्ष
दूरध्वनी -(0253) 2230118

4. **परीक्षा, परीक्षा-अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी :**

उपकुलसचिव, परीक्षा कक्ष, युनिट 1
दूरध्वनी - (0253) 2230716

5.**अध्ययन-साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, ध्वनिफिती, चित्रफिती, ओळखपत्र, इत्यादी :**

भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी - (0253) 2230107

6.**गृहपाठाबद्दल व स्थिती-अभ्यासाबद्दल : माहितीसाठी**

प्रमुख, मूल्यमापन केंद्र
दूरध्वनी - (0253) 2230073

7. **अभ्यासकेंद्रासंदर्भात अडचणी**

संचालक, विद्यार्थी सेवा विभाग
दूरध्वनी - (0253) 2230229

८. परिशिष्ट्ये

परिशिष्ट २ : उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

हा करार अध्ययनार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, अध्ययनार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'अध्ययनार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२) त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३) त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ-बुक, मोबाईल ॲप, दृक्श्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४) तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुविमार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५) त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यचक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६) तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७) त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८) त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा अध्ययनार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९) त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०) तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (ycmou.digitaluniversity.ac. OR ycmou.ac.in) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११) तो विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचा अभ्यास अपेक्षित असलेल्या परिश्रम, शिस्त, प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाचा सुयोग्य अध्ययनार्थ्याप्रमाणे करेल आणि अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यास शोभणार नाही.

परिशिष्ट २ : Candidate/Student Agreement at the time of Admission

Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on "ACCEPT" button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process.

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

The candidate undertakes that -

1. He has gone through the prospectus and the on-screen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
2. He has ensured that he is eligible to the program to which he proposes to take admission and that if it is found otherwise, (that is, if he is found not to be fulfilling the conditions of the eligibility at any time as per the rules mentioned in the prospectus or the on-line narrations) his admission will be summarily cancelled and the fees paid to the university will not be refunded in part or in full.
